MHYA200006602022

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १९७३ प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेला २०२२ चा अविलंबीत खटला अनुक्रमांक ४१७/२०२२.

**निशाणी क्र.२**.

**कोर्ट विद्यमान निलेश प्र. वासाडे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मारेगांव, जि. यवतमाळ**.

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : ०५.११.२०२२. |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : ०५.११.२०२२. |
| ३. | फिर्याददाराचे नाव, | : महाराष्ट्र शासनतर्फे,<br>पोलीस स्टेशन, मारेगांव, जि. यवतमाळ. |
| ४. | आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता | : दादाराव रामा मोरे,<br>वय ४० वर्ष, व्यवसाय : चालक,<br>रा. बोटोणी, ता. मारेगांव,<br>जि. यवतमाळ. |

५. (अ) ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील :

दिनांक ०५.११.२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजताच्या दरम्यान आंबेडकर चौक, मारेगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ येथे ऑटो क्र. एम एच २९ टी ७३६८ हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस धोकादायकरित्या अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभे केलेले दिसून आल्याने तुम्ही भा.द.वि. कलम २८३ प्रमाणे अपराध केला आहे व त्याची मी दखल घेतली आहे.

(ब) कलम व अधिनियम : २८३ भारतीय दंड विधान, १८६०.

(क) मालमत्तेचे मुल्य : ...

आरोपीवर लावण्यात आलेले आरोप त्याच्या मातृभाषेत त्याला वाचून व समजावून सांगण्यात आले.

मारेगांव.<br>दिनांकः ३०/०४/२०२३.

(निलेश प्र. वासाडे)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मारेगांव.<br>जिल्हा यवतमाळ.

आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न १ : तुम्हाला आरोपपत्राच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर : होय.

प्रश्न २ : आता तुम्हाला वाचून दाखविलेले आरोप समजले काय?
उत्तर : होय.

प्रश्न ३ : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे.

प्रश्न ४ : तुम्हाला मोफत कायदेविषयक मदत पाहिजे काय?
उत्तर : नाही.

आरोपीची सही किंवा अंगठा

माझे समक्ष

मारेगांव.
दिनांकः ३०/०४/२०२३.

(निलेश प्र. वासाडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मारेगांव.
जिल्हा यवतमाळ.

MHYA200006602022 स.फौ.ख. ४१७/२०२२.
शासन वि. दादाराव.

**आदेश निशाणी क्र.२ खाली**

(पारित दि.३० एप्रिल, २०२३)

आरोपी आज हजर झाला. आरोपीने निशाणी क्र.२ दोषारोपामधील उल्लेखीत आरोप त्याला मान्य असल्याचे कबूल केले. आरोपीचा हा पहिलाच गुन्हा असल्यामुळे कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली. आरोपीला सदर गुन्हा कबूल करणे बंधनकारक नाही. तसेच गुन्हा कबूल केल्यास शिक्षा होण्याबाबत मी प्रत्यक्षपणे सांगितले. आरोपीस गुन्हा कबुलीचा परिणाम सांगितल्यानंतर देखील गुन्हा कबुलीच्या निर्णयावर आरोपी ठाम आहे. यावरुन आरोपीने कोणत्याही दबावात न येता गुन्हा कबूल केल्याचे दिसून येते. गुन्ह्याचे स्वरुप लक्षात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. आरोपी याला कलम २८३ भारतीय दंड विधान, १८६० अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता कलम २५२ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये रुपये २००/- (अक्षरी दोनशे रुपये फक्त) चे द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येते.

२. दंड न भरल्यास सात दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

Digitally signed by NILESH PRABHAKAR WASADE
Date: 2023.04.30 15:30:43 +0530

मारेगांव. (निलेश प्र. वासाडे)
दिनांकः ३०/०४/२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मारेगांव.
जिल्हा यवतमाळ.